**लिलावामध्ये सहभागी होण्याकरीता अर्जाचा नमुना**

दिनांक:

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**
**कृषी तंत्र विद्यालय, सावंगी,**
**ता. कळमेश्वर, जि. नागपूर**
**तथा, सदस्य-सचिव (लिलाव समिती)**

**विषय : हिवर, बाभूळ व कडूनिंबचे वृक्ष तोडून उचल करण्यासाठीच्या लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता विनंती अर्ज.**

**संदर्भ : आपली जाहिरात क्र. ................... दिनांक.........................**

**महोदय,**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, सावंगी, जिल्हा नागपूर यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहिरात क्र. ............. दि.................. नुसार खालील प्रमाणे माहिती सादर.

१. मी / आम्ही स्वखुशीने कृषी तंत्र विद्यालय, सावंगी येथील प्रक्षेत्रावरील हिवर (९००), बाभूळ (२५५) व कडूनिंब (८८) वृक्ष तोडून उचल करण्याकरीता आयोजित लिलावामाध्ये सहभागी होत आहे / आहोत.

२. मी / आम्ही प्रपत्र - १ मध्ये दिलेल्या लिलावाच्या सर्व शर्ती व अटींचा अभ्यास केला असून मला / आम्हाला लिलावाच्या सर्व शर्ती व अटी मान्य आहेत.

३. वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कळमेश्वर यांचे वृक्ष तोडण्याच्या परवानगी पत्रानुसार वृक्ष तोडून उचल करण्याचा कालावधी ३० दिवसांचा आहे, याची मला / आम्हाला जाणीव आहे.

४. लिलावाच्या शर्ती व अटी प्रमाणे लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता आवश्यक **रु. २५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे फकत)** एवढी **ना परतावा** प्रक्रिया फि ची रक्कम या अर्जासोबत नगदी देत आहे / आहोत.

५. लिलावादरम्यान कोणतेही गैरवर्तन केल्यास वा लिलाव समिती समक्ष कोणत्याही प्रकारचे आमिष निर्माण केल्यास मला / आम्हाला ह्या लिलाव प्रक्रियेमधून बाहेर काढण्यात येईल

व माझ्यावर / आमच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची मला / आम्हाला संपूर्ण जाणीव आहे.

६. कोणत्याही प्रसंगी लिलाव थांबवणे किंवा मंजूर झालेल्या व्यक्ती / समुहाचा लिलाव स्वीकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष, लिलाव समिती तथा सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषी शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांचेकडे राखीव आहेत.

७. मी / आम्ही या अर्जासोबत लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता खाली नमूद केलेले सर्व कागदपत्रे जोडत आहे / आहोत.

<u>**आवश्यक कागदपत्रे:**</u>

१. लिलावामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तीचे / समुहाचे आधारकार्डची साक्षांकीत प्रत.
२. GST क्रमांक (उपलब्ध असल्यास).
३. लिलावामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती / समुहाचे PAN Card (उपलब्ध असल्यास) ची साक्षांकीत प्रत.
४. रु. १००/- च्या स्टॅम्पपेपर वर हमीपत्र (प्रपत्र - १).
५. लिलावाची प्रक्रिया फी (**ना परतावा**) रु. २५००/-.

**सोबत: वरीलप्रमाणे**

**दिनांक:**

**ठिकाण:** **आपला विश्वासू**

(सही किंवा अंगठा ................................)

(नाव: ------------------------------------------)

## हमीपत्र (प्रपत्र -१)

## लिलावाच्या शर्ती व अटी

१. मी / आम्ही कृषी तंत्र विद्यालय, सावंगी येथील प्रक्षेत्रावरील हिवर (९००), बाभुळ (२५५) व कडूनिंब (८८) वृक्षांची तोड करून उचल करण्याकरिता दिनांक............. रोजी आयोजित लिलावामध्ये स्वखुशीने सहभागी होत आहे / आहोत .

२. लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता आवश्यक असलेली **ना परतावा** लिलाव प्रक्रिया फीची रक्कम **रु. २५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे फक्त)** मी / आम्ही नगदी भरण्यास तयार आहे / आहोत.

३. वनविभागाद्वारे ठरवून देण्यात आलेली झाडांच्या मुल्यांकनाची रक्कम निकटच्या शेकडा पुर्नांकामध्ये करुण ती शेकडा पुर्नांकाची रक्कम लिलावाच्या बोलीची आधारभूत रक्कम मानण्यात येईल.

४. लिलावामध्ये सहभागी होणा-या व्यक्ती / समूहाला बोली लावावयाची असल्यास लिलावाच्या बोलीच्या आधारभूत रकमेवर १०००/- रुपयांच्या पटीत बोली वाढवून बोली लावावी लागेल.

५. ज्या सर्वाधिक बोली बोलना-या व्यक्ती / समूहाचे दर लिलावामाध्ये मंजूर होतील त्या व्यक्ती / समूहास **रु.२५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)** अनामत रक्कम (Security Deposit) म्हणून प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, सावंगी येथे लिलाव झाल्याबरोबर तात्काळ भरणे बंधनकारक आहे.

६. लिलाव प्रक्रिया फी तथा अनामत रकमेचा भरणा रोख स्वरूपात करत असतांना संपूर्ण रोकडचे (नोटांचे) विवरण देणे बंधनकारक आहे. खोटी रोकड (नोटा) जमा केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

७. लिलावात मंजूर झालेली संपूर्ण रक्कम एकरकमी (एकाच वेळी) लिलाव झाल्यापासून तीन (०३) दिवसांच्या आत वृक्ष तोडणी सुरु करण्यापूर्वी प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, सावंगी येथे भरणा करणे बंधनकारक आहे.

८. मा. वनपरिक्षेत्र अधिकारी, कळमेश्वर यांचे वृक्ष तोड आदेशानुसार वृक्ष तोडणी व उचल करण्याकरिता फक्त ३० दिवसांचा अवधी दिला जाणार आहे. दिलेल्या अवधीमध्ये काम पूर्ण न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी वृक्ष तोडणाऱ्या व्यक्ती / समूहाची राहील व अतिरिक्त कालावधीची गरज असल्यास अतिरिक्त कालावधी देण्यासंबधीचे सर्व हक्क मा. अध्यक्ष तथा सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषी शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांचेकडे राखीव आहेत.

९. वृक्ष तोडून त्याची उचल करणे व प्रक्षेत्र साफ करण्याची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणाऱ्या व्यक्ती / समुहाची राहील.

१०. वृक्ष तोडनी / मालाची उचल करण्याकरिता कोणत्याही परीस्थितीत प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, सावंगी यांचेकडून मजूर किंवा वाहन पुरविले जाणार नाही.

११. वृक्ष तोड करून माल प्रक्षेत्रामधून इतर ठिकाणी पोहचविण्याची जबाबदारी लिलाव मंजूर झालेल्या व्यक्ती / समुहाची राहील. तसेच कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास लिलाव मंजूर झालेले व्यक्ती / समूह त्याला जबाबदार राहील / राहतील.

१२. लिलाव झाल्यापासून मालाच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणा-या व्यक्ती / समुहाची राहील.

१३. काम करत असताना कोणत्याही प्रकारचे नुकसान / चोरी / दुर्घटना / जीवित हानी झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१४. लिलावामध्ये सहभागी होणारे सर्व व्यक्ती / समुहांनी प्रक्षेत्रावरील झाडांची पाहणी करूनच लिलावामध्ये सहभाग घ्यावा.

१५. लिलाव मंजूर झालेल्या व्यक्ती / समुहाने जमा केलेली अनामत रक्कम (Security Deposit) काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, सावंगी यांचे कार्यालयास अर्ज सादर केल्यावर परत करण्यात येईल. तसेच विद्यापिठाच्या मालकीचे वस्तू / प्रक्षेत्राचे नुकसान झाल्यास त्याची वसुली अनामत रकमे (Security Deposit) मधून कपात करून उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.

१६. लिलावामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्ती / समूहांना **हमीपत्र (प्रपत्र -१)** लिलावाच्या शर्ती व अटी रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर स्वतःची स्वाक्षरी व मोबाईल क्रमांक नमूद करून लिलावाच्या रोजी लिलावात सहभागी होण्याच्या अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

१७. लिलावामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्ती / समूहांनी कोवीड प्रतिबंधात्मक शासकीय नियमांचे / निर्देशांचे पालन करणे अनिवार्य आहे.

वरील अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या किंवा मला / आम्हाला समजावून सांगितल्या व त्या मला / आम्हाला मान्य आहेत.

**दिनांक:**

**ठिकाण:**

**सही / अंगठा**

संपूर्ण नावः ----------------------------------------------